# खंडेलवाल विद्यालयामध्ये सायबर सिक्युरिटीवर मार्गदर्शन



सायबर सिक्युरिटीसंदर्भात भिकमचंद खंडेलवाल विद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी उपस्थित मान्यवर.

**प्रतिनिधी | अकोला**

भिकमचंद खंडेलवाल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, अकोला येथे सायबर क्राईम म्हणजे काय, सायबर क्राईम कशा प्रकारे घडतात, वाढत्या सोशल मीडियाच्या माध्यमातून ऑनलाइन फसवणूक कशी होते, मोबाइलमध्ये येणारे नवीन ॲप्सद्वारे डेटा कशा प्रकारे जमा केला जातो आणि त्याद्वारे कशी फसवणूक होते, याबाबत येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या. शीतल साखरे आणि नेहा टेरे या विद्यार्थिनींनी उपयोगी आणि उत्कृष्ट मार्गदर्शन केले आणि अशा ऑनलाइन फसवणुकीपासून कसे दूर राहावे, कोणती काळजी घ्यावी, याविषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली.

हा उपक्रम क्विक हिल फाउंडेशन, पुणे, महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई यांच्या सहयोगाने प्राचार्य डॉ. जगदीश साबू, डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला होता.

या वेळी, मुख्याध्यापक अभय वानखडे यांनी अनुभव कथन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन फडणीस यांनी केले. नीलेश देशपांडे यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला पर्यवेक्षक रमेश धुळे, शिक्षक , शाळेचे कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.